सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण (२४०६ ८६१३) लेखाशीर्षांतर्गत उर्वरित अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१७/प्र.क्र.६१/फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २० मार्च २०१८

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क. ७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
२) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ६८/अर्थ-३, दि. १.०४.२०१७.
३) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
४) शासन निर्णय क्रमांक साववि-२०१७/ प्र.क्र. ६१/ फ-११, दिनांक १५ एप्रिल, २०१७
५) विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क. ७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८.
६) महसूल व वन विभाग शासन ज्ञापन कमांक बीयुडी-२०१८/२४०६/ प्र.क्र. ३१/ बं-१, दि. १२.०३.२०१८

प्रस्तावना :-

सामाजिक वनीकरणाचे महत्व लक्षात घेऊन वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता सामाजिक वनीकरणांतर्गत **"डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण"** या योजनेंतर्गत सन २०१७-१८ करिता ४८०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्यापैकी रु. ८०.०० लक्ष इतका निधी एप्रिल ते मे २०१७ या दोन महिन्यांकरिता रु. ८०.०० लक्ष लेखानुदान म्हणून निधी संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या दि. ३०.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पित निधीच्या ७० % म्हणजे रु. ३३६.०० लक्ष वितरणासाठी उपलब्ध असून त्यापैकी रु.८०.०० लक्ष इतका निधी लेखानुदान वितरित करण्यात आला आहे. उर्वरित रु.२५६.०० लक्ष निधी जुन २०१७ ते मार्च २०१८ या १० महिन्यांकरिता दि. १९.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला आहे. आता वित्त विभागाने मंजूर केलेल्या आठमाही सुधारित अंदाजानुसार उपरोक्त लेखाशिर्षाली उपरोक्त योजनेसाठी उर्वरित रक्कम रु.४८.०० लक्ष वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणा-या **"डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण"** या योजनेकरिता रु.४८०.०० लक्ष इतका निधी मार्च, २०१७ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पीत निधीपैकी माहे एप्रिल, २०१७ ते मे २०१७ या २ महिन्यांकरीता रु. ८०.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दि.३०.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पित निधीच्या ७० % म्हणजे रु.३३६.०० लक्ष वितरणासाठी उपलब्ध असून त्यापैकी रु. ८०.०० लक्ष इतका निधी लेखानुदान म्हणून वितरित करण्यात आला आहे. उर्वरित रु.२५६.०० लक्ष निधी जुन २०१७ ते मार्च २०१८ या १० महिन्यांकरिता दि.१९.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये

वितरित करण्यात आलेला आहे. आता वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजानुसार उपरोक्त लेखाशिर्षाली उपरोक्त योजनेसाठी उर्वरित रक्कम रु.४८.०० लक्ष वितरित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. विवरणपत्र-१ प्रमाणे निधी वितरणाचा कॅश फ्लो सोबत जोडला आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास महासंचालक, सामाजिक वनीकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

"मागणी क्र.सी-७,
२४०६ वनीकरण व वन्यजीवन, (योजनांतर्गत)
(०१) वनीकरण, १०२, सामाजिक क्षेत्रीय वनीकरण
(०३) (०४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण- (२४०६८६१३)
५०- इतर खर्च".

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थसं-३, दिनांक ३० जून, २०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच महसूल व वन विभाग ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१८/२४०६/ प्र.क्र. ३१/ बं-१, दि. १२.०३.२०१८ **व** विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८. ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२११२४१०१४९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.21 12:43:46 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, (वने) महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख),नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
५. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
६. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई४०० ०३२.
९. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१०. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. निवडनस्ती/फ-११.

विवरणपत्र -१

शासन निर्णय क्र.सावनि-२०१७/प्र.क्र.६१/फ-११, दि.२० मार्च २०१८

योजनेचे नावः-"डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण"

मुख्यलेखाशीर्ष :- (२४०६ ८६१३)

(रु. लाखात)

सविस्तर लेखाशीर्ष	अर्थ संकल्पित रक्कम	लेखानुदान व दि. १९.९.२०१७ अन्वये वितरित निधी	आठमाही सु.अं. नुसार संपूर्ण वर्षासाठी खर्चासाठी उपलब्ध निधी	मार्च २०१८	एकूण रकाना क्र. (३+५)
१	२	३	४	५	६
मागणी क्र.सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, (योजनांतर्गत) (०१) वनीकरण, १०२, सामाजिक क्षेत्रीय वनीकरण (०३) (०४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण- (२४०६ ८६१३) ५०- इतर खर्च	४८०.००	३३६.००	३८४.००	४८.००	३८४.००

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.21 12:44:03 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव महसूल व वन विभाग